ST. JOHN'S PUBLIC SCHOOL CBSE,NAGPUR

SECOND TERM EXAMINATION (2019—20)

Name : _____	**Subject: Marathi**	**Max. Mks : 50**
Roll No. :_____	**Class : VII**	**Time : 3Hrs**
Date _____	**Session : 2019- 20**	**No. Of Ques. : 13**

सामान्य निर्देश :

क) प्रश्नपत्राला चार भागात वेगवेगळे केले आहे.

ख) सर्व प्रश्न आवश्यक आहेत. प्रश्न क्रमांक अचूक आणि स्पष्ट लिहावा.

ग) उत्तर स्पष्ट आणि सुंदर अक्षरात लिहावे.

घ) प्रश्न पत्र लक्षपूर्वक वाचावे.

खंड' क '(गद्यांश पद्यांश) **(1x5 =5m)**

प्रश्न 1) खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा-

पिंपळाचे झाड खूप डौलदार दिसते .पिंपळाची पाने नेहमी सळसळ आवाज करतात .पिंपळाखाली नेहमी थंडगार सावली असते. प्राचीन मुनी देवाची प्रार्थना करण्यासाठी या झाडाखाली बसत. भगवान बुद्ध याच झाडाखाली बसले होते. याच झाडाखाली त्यांना ज्ञान मिळाले .म्हणून या झाडाला 'बोधिवृक्ष' हे दुसरे नावही आहे. बोधिवृक्ष म्हणजे 'ज्ञान देणारे झाड'

प्रश्न1) पिंपळाचे झाड कसे दिसते?

2) पिंपळाची पाने नेहमी कसा आवाज करतात?

3) पिंपळाच्या झाडाखाली देवाची प्रार्थना करण्यासाठी कोण बसत?

4) पिंपळाच्या झाडाला दुसरे कोणते नाव आहे?

5) 'बोधीवृक्ष' म्हणजे काय?

प्रश्न 2) खालील कविता वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. **(1x5 =5m)**

आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही
म्हणून श्रीकाराच्या नंतर शिकणे अ ,आ, ई
तीच वाढवी ती सांभाळी
ती करी सेवा तीन त्रिकाळी
देवानंतर नमवी मस्तक आईच्या पायी
कौसल्येविण राम न झाला
देवकीपोटी कृष्ण जन्मला
शिवरायाचे चरित्र घडवी, माय जिजाबाई

प्रश्न 1) संपूर्ण जगात कोणते दैवत नाही?

2) श्रीकारा नंतर काय शिकायचे?

3) जिजाबाईंनी काय केले?

4) रामाच्या आईचे नाव काय आहे?

5) कृष्णाने कोणाच्या पोटी जन्म घेतला?

खंड 'ख ' (पाठावर आधारित)

प्रश्न3) योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण लिहा. **(1x4=4m)**

(लोटी, अधिपतीची,राजापूरच्या,यष्टीवर)

1) प्रशिक्षक ----------वर एक रुपयाचं नाणं ठेवत असत.

2) वर ----------ठेवतात.

3) ---------- येथील मराठी कुटुंबात सचिनचा जन्म झाला.

4) वाराच्या ---------- पूजा केली जाते.

प्रश्न4) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.(any5) **(1x5 =5m)**

1) हिंदू धर्मियांच्या नवीन वर्षाची सुरुवात कोणत्या सणाने होते?

2) सचिन कुटुंबीयांचे आवडते संगीत दिग्दर्शक कोण?

3) कुठे किड माजली आहे?

4) डॉ. कलाम कुठे जन्मले?

5) पंचारती कोणाच्या हातात आहे?

6) प्रशिक्षक स्टम्पवर काय ठेवत असत?

प्रश्न 5) चूक की बरोबर ते लिहा. **(1x3=3m)**

1) सचिन नियमितपणे गोलंदाजी करतो.

2) भ्रष्टाचार करणे योग्य आहे.

3) चंद्रलेखा लाल्याला लाच द्यायला सांगते.

प्रश्न 6) अर्थपूर्ण वाक्य बनवा. **(1x3=3m)**

1) जाते घर स्वच्छ केले या उठून पहाटे दिवशी.

2) केले हजार सैनिक तयार सहा.

3) नाही स्पर्श मद्याला करत.

खंड' ग' (व्याकरण)

प्रश्न 7) खालील दर्शविलेल्या प्रमाणे उत्तरे लिहा. **(20m)**

क) खालील वाक्यातील काळ ओळखा. 1) शेतकरी शेतात काम करीत आहेत

ख) समानार्थी शब्द लिहा. 1) विखार 2) पहाट

ग) विरुद्धार्थी शब्द लिहा. 1) उदास 2) प्रकाश

घ) शब्द समूहाला एक शब्द लिहा : 1) भाषण ऐकणारा 2) विक्री करणारा

ड़) सुचनेनुसार वाक्य पुन्हा लिहा 1) त्या माणसाने काम मागितले.(प्रश्नार्थक)

2) आई दृष्ट नव्हती.(होकारार्थी)

च) खालील वाक्य शुद्ध करून पुन्हा लिहा. 1) सहल कूटे चाललि आहे.

2) आकाशत काडे ढग दिसू लागले.

छ) योग्य विरामचिन्हांचा उपयोग करून वाक्य पुन्हा लिहा.

1) काय रे वसतीगृह म्हणजे काय होतं.

ज) खालील वाक्यप्रचारांचा वाक्यात उपयोग करा. 1) अभिमान वाटणे 2) कणव येणे

झ) संधी करा . 1) प्रत्येक 2) स्वाभिमान

ट) 'दार' प्रत्यय लावा. 1) जबाब 2) दम

ठ) म्हणी पूर्ण करा - 1) उथळ पाण्याला---------- ----------

2) काखेत कळसा ---------- ----------

प्रश्न 8) चित्र वर्णन : खालील चित्र बघून त्याचे वर्णन करा. **(5m)**